# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(विशेष)**

**दिनांक २४.०९.२०२६ गुरूवार**

**१) गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपींना अटक, ०३ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०६.०८.२०२६ चे ०३.३० वा. ते दि. ०७.०८.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी जमशेद शमशाद शेख, वय २६ वर्षे, रा. न्यु पॅन्थर नगर झोपडपट्टी, मदरसा शाळेजवळ, वाठोडा रोड, नंदनवन, नागपूर हे त्यांची सुझुकी बर्गमॅन मोपेड क्र. एम.एच ४९ सि.ई १०२३ किंमती ७०,०००/—रू. ची पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील आपले राहते घरासमोर लॉक करून, पार्क करून ठेवले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद मोपेड वाहन चोरून नेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी नामे १) जावेद रशीद खान, वय ४२ वर्षे, रा. बेले नगर, खुशी किराणा दुकान चे बाजुला, नुरी मस्जीद मागे, कळमना, नागपुर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्यास त्याचा साथीदार पाहीजे आरोपी क्र. २) वेदांत उर्फ कालु विलास चाटे, रा. टिमकी, नागपुर आणि ३) सुरेंद्र उर्फ कालु लिलाधर होले, रा. कोलबास्वामी वाचनालय जवळ, टिमकी, नागपुर यांनी चोरीची एकुण ०३ दुचाकी वाहने विक्रीकरीता आणुन दिल्याचे सांगुन, त्या वाहनांवर कमिशन मिळविण्याचे लोभात त्याने ती वाहने आपले दुकानात ठेवले आहेत, असे कबुल केले. आरोपीस गुन्ह्यात अटक करून, त्याचे ताब्यातुन चोरी केलेले १) सुझुकी बर्गमॅन मोपेड क्र. एम.एच ४९ सि.ई १०२३ २) होंडा ॲक्टीवा मोपेड क्र. एम.एच ४९ बि.एन ३५७०, ३) होंडा ॲक्टीवा मोपेड क्र. एम.एच ४० सि.पि ३०८६ असे एकुण ०३ दुचाकी वाहने किंमती अंदाजे १,७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वाहनांबाबत अधिक तपास केला असता, वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त, पो.ठाणे कळमना व पो. ठाणे रामटेक नागपुर ग्रामीण येथे आरोपीकडुन जप्त वाहनांबाबत वाहनचोरीचे कलमान्वये गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाल्याने, आरोपीकडुन एकुण ०३ वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी नंदनवन पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दिलीप चंदन, सफौ. दिपक रिठे, पोहवा. शंभुसिंग किरार, सचिन

बढीये, किशोर सोमकुंवर, पोअं. विवेक कावडकर व अभय ढोणे यांनी सायबर पथकाचे पोउपनि. विवेक झिंगरे व त्यांचे टिमचे सहाय्याने केली.




**२) पोलीस उपायुक्त परि.क्र. २ पथकाची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २३.०९.२०२६ चे ०१.४५ वा. ते ०३.०० वा. चे दरम्यान, पोलीस उपायुक्त परि.क्र. ०२ पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, कॅफे हाऊस चौक, धरमपेठ येथील डि—मार्टीन लाऊंज रूफटॉप रेस्टॉरेंट व कॅफे येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी हुक्का पार्लर मालक नामे रितीक राजेंद्र भावसार, वय ३४ वर्षे, रा. प्लॉट नं. ४३८, आनंदी अपार्टमेंट, वैशाली नगर, पाचपावली, नागपूर हा मॅनेजर आरोपी क्र. २) नितेश धर्मेंद्र पटेल, वय २७ वर्षे, रा. गवळीपुरा, धरमपेठ, नागपुर चे मदतीने ग्राहकांना शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपी हे विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य असा एकुण १५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी मालक व मॅनेजर यांचेविरूध्द पोलीस ठाणे सिताबर्डी येथे कलम ४(अ),५,२१ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३ महाराष्ट्र सुधारणा अधिनियम २०१८ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह सिताबर्डी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उपआयुक्त (परि.क्र. २) नागपूर शहर यांच्या मार्गदर्शनाखाली, पथक प्रमुख अधिकारी तसेच, पोअं. स्वरूप मानकर व अतुल पांडेय यांनी केली.

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**